GLOBAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
मराठी माणसाचे स्वतःचे वृत्तपत्र.

# मुंबईचे ‘शांघाय’ नाही मुंबईच बनवू!

## मुख्यमंत्र्यांची ग्वाही




*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. अनिल काकोडकर यांना ‘प्राइड ऑफ महाराष्ट्र’ हा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी के. वेंकटरमन, अर्नेस्ट जोसेफ, राकेश सिंग, नलीन शाह, अविनाश गुप्ता यांनाही स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.*

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) – राज्यात जास्तीत जास्त गुंतवणूक व्हावी यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करून देण्यावर सरकारने प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले आहे. त्यासाठी उद्योगांच्या वाढीस खीळ घालणारे जाचक नियम व कायद्यात बदल करणे आवश्यक असून हे करत असताना मुंबईचे ‘शांघाय’ नव्हे तर मुंबईची ओळख कायम ठेवून तिला मुंबईच बनवू, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

तिसऱ्या महाराष्ट्र इकॉनॉमिक समिटचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. मुंबईतील पश्चिम द्रुतगती महामार्गावरील ताण कमी करण्यासाठी कोस्टल रोडचे बांधकाम तत्काळ सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. गुंतवणूक वाढीसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला विशेष अधिकार देण्यात येणार असून येत्या काळात महाराष्ट्र निश्चितच अग्रेसर ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.